# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १८/०६/२०२३

### खुनाचा प्रयत्नः–

| अ .क्र . | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता ० | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे सिटी कोतवाली अप क्र.२५७/२३ कलम ४५२,३०७,३८६,५०४ ,५०६ (२)३४ भादवी | ईतवारा बाजार पिंजारा मस्जिद समोर अमरावती . | दि.१७.०६.२०२३ चे १६.३० वा ते १७.०० वा दरम्यान<br><br>दि.१७.०६.२०२३ चे २०.५८ वा | निशांत मनोज गुप्ता वय ३० वर्ष व्यवसाय - गव्हरमेंट कॉन्ट्रेक्टर म न पा रा मटन मार्केट समोर पहिला गल्ली मसानगंज अमरावती | १) सोनु कैलाश गुप्ता रा रामबाग मसानगंज अम.<br>२) अनोळखी इसम | हकिकत अशा प्रकारे आहे की,मी समक्ष विचारले वरुन सांगतो की, नमुद पत्यावर राहत असुन गव्हरमेंट कॉन्ट्रेक्टर बांधकाम म न पा येथे काम करतो.माझे ईतवारा बाजार येथे ऑफिस असुन त्या ठिकाणावरुन बांधकामाचे काम पाहतो दि.१७.०६.२३ रोजी दुपारी ०४.०० वा ईतवारा बाजार येथे माझे बांधकामाचे ऑफिस वर गेलो माझे कामाचे काम करीत होतो.दुपारी अंदाजे ०४.३० ते ०५.०० वा दरम्यान माझ्या समाजाचा व माझ्या मोहल्.यात राहनारा सोनु कैलाश गुप्ता रा रामबाग मसानगंज अम.व त्याचे सोबत एक अनोळकी ईसम वय अंदाजे २८ ते ३० वर्षाचा हे ईसम माझ्या ऑफिस मध्ये आले व सोनु गुप्ता याने मला म्हणाला क्यु रे ..जाद्या की बात करता तु..बहोत उचा हो गया क्या..तेरे को ईस के पहले खर्चे को पैसे माग रहा था तुने दिये नही ..बहुत उचा हो गया क्या..मैने सोनु को बोला की,तुझे ईसके पहिले हि मैने दारु पिने के लिए पैसे दिये थे..अब मेरे पास पैसे नहि है ।.असे मी सोनु गुप्ता याला म्हटले असता त्याने खिशातुन चाकु काढुन माझे डोक्यावर मारला ..त्यानंतर मी त्याचे चाकुचे वार चुकविले असता त्याने सपासप वार डोक्यावर कपाळावर ,ओठावर ,डाव्या खांद्यावर चाकुने मारहान केली तसेच मी त्याचा चाकु पकडन्याचा प्रयत्न केला असता माझ्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला चाकुचा मार लागला त्यामुळे माझ्या हाताच्या बोाटाला जखम होवुन रक्त निघाले तसेच सोनु गुप्ता याचे सोबत असलेल्या ईसमाने अश्लिल शिवीगाळ करीत..तुझे हम जानसे मार देंगे..असे म्हणुन त्याने मला अश्लिल भाषेत शिवीगाळ केली व मी चिल्ला पुकार केल्याने आजुबाजुच्या बाजारातील लोक माझ्या ऑफिस समोर जमा झाले लोक जमा झाल्याने व मी चिल्ला पुकार केल्याने सोनु गुप्ता व त्याचे सोबत असलेला ईसम हा दोघे तेथुन पळुन गेले माझ्या ऑफिस चे मागे माझ्या बुवाचा मुलगा कुमोद ईश्वर लाल साहू याचे दुकान असल्याने त्यांना आवाज आल्याने ते लगेच माझ्या ऑफिस वर आला त्याने त्याचे मोटर सायकल वर बसुन झेनित दवाखाना येथे आणुन भरती केले माझ्या ओळखिच्या व समाजाचा तसेच मोहल्यात राहनारा सोनु कैलाश गुप्ता व त्याचे सोबत एक अनोळखी ईसम हे माझ्या बांधकामाचे ऑफिस वर ईतवारा बाजार येथे माझ्या ऑफिस चे आत मध्ये आले व सोनु गुप्ता याने मला शिवीगाळ करुन म्हणाला की,तु मला दारु पिन्या करीता पैसे का देत नाही असे म्हणुन त्याने शिवीगाळ करुन त्याचे पॅन्ट चे खिशातुन चाकु काढुन माझ्या डोक्यावर ,कपाळावर ,ओठावर डाव्या खांद्यावर ,डाव्या हाताचे बोटावर चाकुने सपासप वार करुन जिवे ठार मारन्याच्या उद्देशाने मारहान केली .सोनु गुप्ता याचे सोबत असलेला ईसमाने अशलिल भाषेत शिवीगाळ करुन जिवे ठार मारन्याची धमकि दिली.अशा फि.चे बयान वरुन व मेडि सर्टिवरुन डि ओ सा यांचे शेरावरुन सदरचा गुन्हा दाखल . |

## चोरी :–

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र. ८२३/२३ कलम-३७९भादवी | सहकार नगर अमरावती | घतावेळ दि. १०.६.२३ चे १२.००वा<br><br>दातावेळ दि. १७.६.२३ चे १७.१८ वा | परशराम धनुश्री ओळबे वय- ७३ रा. प्रकाश नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी यानी च्याच्या ताब्यात असलेली लोडगाडी वस्तु विकुन सहकार नगरच्या फुटपाथ वर लॉंक करुन उभी केली व दुसर्या दिवशी लोडगाडी ठेवण्यात आली तेथे दिसली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली लोडगाडीची किअ.२०००/- रु ..अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासाता घेतला . लागलीच दाखल दाखल अधिकारी -पोउपनि ढोके भेट-दि.१७.०६.२३ चे १७.२५ ते १८.१५ वा |

## वाहन चोरी :–

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र. ८२४/२३ कलम-३७९भादवी | पोस्टे गाडगेनगर हद्दीत | घ ता वेळ दि. १६.६.२३ चे १०.००वा<br><br>दातावेळ दि. १७.६.२३ चे १७.५६ वा | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी याचा मुलगा हा ट्युशन कॉंलस वरुन घरी परत आला व त्याच्या ताब्यातील सायकल हि अंगणात उभी केली व तो घरात गेला नमुद वेळी सायकल पाहीली असता सायकल दिसुन आली नाही . सायकलचे वर्णन - हिरो कम्पनीचा रंग निळा व लाल रंगाची फ्रेम क्र एक्स आय बी एल ए एच एस एन ८७१२००८० कि.अ. ५०००/- रु कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## पळवुन नेणे :–

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | बडनेरा अप.नं. ४४१/२३ कलम ३६३ भा. दं. वि. | पो.स्टे.बडनेरा हद्दीत | दि. १६.०६.२३ चे १५०० वा. माहीती वेळ - दि. १७.०६.२३ चे २०.०० वा. दाखल वेळ - दि. १७.०६.२३ चे २१.१८ वा. | पिडीतेचे नातेवाईक | अज्ञात. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादीची नातेवाईक ही फिर्यादीच्या घरी राहत असुन ती विद्यालयात शिकायला होती. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी पिडीत ही घरात टी. व्ही. पाहत होती. त्यानंतर ती घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेली. तिचा आजपावेतो शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे, असा फिर्यादीस संशय आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल. |

**अपघात :—**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप क्र ४४३/२०२३ कलम २७९,४२७भादवी सहकलम 134 मपोका | चपराशी पुरा चौकात शुक्रवार बाजार ते भातकुली कडे जाणारा रोड अमरावती | दि १७/०६/२०२३ चे 13/45 वा. दा.ता.वेळ<br>दि १७/०६/२०२३ चे १६/18 वा. | विजय नामदेवराव प्रधान वय 42 वर्ष रा. वडाळी कँम्प देवीनगर, अमरावती | 12 चक्का ट्रक क्र. एम एच 27-ए वी 2736 चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे महाराष्ट्र राज्य परिवहन येथे चालक या पदावर असुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे चांदुर रेल्वे बस स्टॉफ मधुन लाल रंगाची एश टी बस क्र. एम एच 40 वाय 5784 ह्या गाडीने चांदुर रेल्वे ते औरंगाबाद जात असतांना चपराशी पुरा ते अमरावती बस स्टांफ कडे जात असतांना चपराशी पुरा चौकात शुक्रवार बाजार ते भातकुली कडे जाणारा रोड वरुन 12 चक्का ट्रक क्र. एम एच 27-ए वी 2736 चा चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगावे व हयगयीने चालवुन फिर्यादीच्या ताब्यातील एसटी ला मागील साईडला धडक दिली व पळुन गेला व गाड़ीचे 20000/- रुपयाचे नुकसाम केले. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पो.स्टे. नांदगावपेठ अप.क्रं.२२०/२०२३ कलम २७९,३३७,३३८ भांदवी | NH-६ रोड रहाटगाव-T पॉइन्ट अम. | दि.१६/०६/२०२३ चे रात्री २१.२० वा दरम्यान<br>दाखल ता. वेळ दि.१७/०६/२०२३ चे ०१/४९ | अभिषेक संतोष श्रीवास वय १८ वर्ष व्यवसाय नौकरी रा.मनपा शाळा नं.०२ संदेश किराणा दुकाना जवळ मसानगंज अमरावती | मारोती स्विप्ट गाडी क्रं MH २७ BE-२६२० चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की मी समक्ष विचारले वरुन सांगते की वर नमुद पत्यावर राहतो. ड्रिमलॅन्ड नागपुर रोड येथे रिया ऑटोपार्ट चे दुकानात मी व माझ्या मोहल्यातील राज मोहण साहु वय २१ वर्ष हकीकत अशा प्रकारे आहे की मी समक्ष विचारले वरुन सांगते की वर नमुद पत्यावर राहतो. ड्रिमलॅन्ड नागपुर रोड येथे रिया ऑटोपार्ट चे दुकानात मी व माझ्या मोहल्यातील राज मोहण साहु वय २१ वर्ष असे दोघे आम्ही काम करतो. आज दि.१६/०६/२०२३ चे रात्री ०९.२० वा. चे सुमारास मी व माझा मित्र राज साहु असे आम्ही आमचे दुकानाचे मालक राजकुमार तकतानी रा. प्रिया टाउनशिप शेगाव राहटगाव रोड यांच्या मालकीची इलेक्ट्रीक स्कुटर घेउन आमचे घरी मसानगंज येथे चाललो होतो. गाडी माझा मित्र राज साहु चालवीत होता. नागपुर रोडवरुन रहाटगाव रिंग रोड कडे वळत असता अमरावती कडुन एक मारोती स्विप्ट कार ही भरधाव वेगाने आली आमचे स्कुटर ला धडक मारली. त्यामुळे आम्ही दोघेही रोडवर फेकल्या गेलो. मला उजव्या डोक्याचे वर व ओठाला , डोक्याला मागचे बाजुस व छातीवर मार लागला व डाव्या पायाला मुका मार लागला व माझा मित्र राज साहु यास पायाला मार लागला असुन त्याचा पाय फॅक्चर आहे. आम्हा दोघांना IRB AMBULANCE ने इर्विन दवाखाना येथे इलाजाकरीता आणले. राज यास पाय फॅक्चर असल्याने त्यास त्याचे नातेवाइकांनी ईलाजाकरीता प्रॅायवेट दवाखान्यात नेले आहे. सदर कार ही पुढे जाऊन थांबली होती. तिचा नंबर MH २७ BE-२६२० असा आहे. सदर कार चालक यांचेवर कार्यवाही करीता बयाण देत आहे. अशा फिर्यादी यांचे बयाणावरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो स्टे सिटी कोतवाली अप क्र २५५/२३ कलम २७९,३३७ भादवि | डॉ.देशमुख यांचे दवाखान्याजवळ इर्वीन चौक मज्जीत रोड अमरावती | १६/०६/२३ चे १४.०० वा<br>दाखल ता वेळ<br>दि १७/०६/२३ चे १३.५२ | शेख ईलीयास शेख मुस्तफा वय ५५ वर्ष रा गुलीस्तानगर गुड्डु दवाखाणअयाजवळ आस्मीन नगर | अज्ञात वाहनाचा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की जबानी रिपोट मी समक्ष पो.स्टे ला येवुन जबानी रिपोट देतो की वरील कुटुबासह राहतो व भजीपाला विक्रीचे काम करतो कॉटन मार्केट .येथुन भाजीपाला खरेदी करुन भाजीपाला रिक्षात घेवुन भाजीपाला विक्री करतो दि.१६/६/२३ रोजी दुपारी ०२.०० वा चे दरम्यान मी माझी भाजीपाल्याची रिक्षा गाडी भाजीपाला घेवुन ईर्वीन चौक कडुन डॉ.देशमुख यांच्या दवाखाण्याजवळुन मज्जीद चौक डेपो कडे जात असतांना मागुन एक चारचाकी पांढ-या रंगाची गाडी आली आणि त्या गाडीच्या चालकाने माझ्या रिक्षास मागुन धडक मारली त्यामुळे मी माझा रिक्षा घेवुन खाली उतरलो व पडलो त्यात माझ्या उजव्या खांद्याला जबर मार लागला त्या गाडी चालकाच्या चालकाने त्याचे गाडीने धडक मारुन तो त्याची गाडी घेवुन तेथुन निघुन गेला व उफचार केला काल मला जास्त त्रास असल्याने मी नागपुरी गेट येथील प्रायव्हेट दवाखान्यात गेलो व उफचार केला काल मला जास्त त्रास असल्याने रिपोट देण्यास येवु शकलो नाही मला या अनोळखी गाडीच्या चालकाने धडक मारुन अपघात केला त्यामुळे कार्यवाही करीता रिपोट देत आहे हाच माझा जबानी रिपोट आहे वरुण फिर्यादीचे जबानी रिपोट व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बडनेरा मर्ग क्र ३९/२०२३ | ग्रामपिपरी यादगिरे<br>घटना ता वेळ - दि १७.०६.२३ चे ०७.०० वा पुर्वी.<br>दाखल ता. वेळ - दि. १७.०६.२३ चे ११.१८ वा. | मोतीलाल फकीराजी जंवजाळ वय ५५ वर्ष रा पीपरी यादगिरे | हीरालाल फकीराजी जंवजाळ वय ५२ वर्षे पिपरी यादगिरे | गळफास घेवुन आत्महत्या | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील मृतक नामे मोतीलाल फकीराजी जंवजाळ वय ५५ वर्ष रा पीपरी यादगिरे हे फिर्यादीचे सख्खे मोठे भाऊ असुन ते एकाच गावात घराशेजारी राहत होते. त्यांना डोक्याचा मानसिक आजार होता. त्यांचे दोन्ही मुले मंदबुध्दी असुन पत्नि सुध्दा आजारी राहत होती. या सर्वाचा तो नेहमी विचार करीत असे. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी मृतकाने घरात गळफास घेऊन लटकलेल्या स्थितीत फिर्यादीस दिसुन आल्याने त्यांना खाली उतरवुन तात्काळ ऑटोत टाकुन इर्विन दवाखाना अमरावती येथे नेण्यात आले. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांची पाहणी करून त्यांना मृत घोषीत केले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा मर्ग दाखल. |
| २ | पो स्टे गाडगे नगर अम.<br>मर्ग क्र ३९/२३ कलम १७४ जाफौ | संतोषी नगर अमरावती<br>घ ता वेळ- दि.१७.०६.२३ चे ०९.३० वा<br>दा ता वेळ- दि.१७.०६.२३ चे १५.५५ वा | शालीकराव सुर्यभानजी सोनवणे वय ६० वर्ष रा संतोषी नगर अम | पोहेका प्रमोद ब नं ११८१ पो स्टे गाडगे नगर अमरावती | जी डी आजार समजुन आले नाही | हकीकत .याप्रमाणे आहे की इरविन चौकी येथुन वायरलेस माहीती दिली की वार्ड क्र ६ मध्ये शालीकराव सुर्यभानजी सोनवणे वय ६० वर्ष रा संतोषी नगर अम ते उपचारकरिता भरती झाले त्याचा दि,१७.०६.२३ रोजी ०९.३० वा पुर्वी मृत्यु झाल्याने त्याचे मरणाचे कारण जी डी आजार समजुन आले नाही अशा मेंमो क्र २११५१ प्राप्त झाल्यावरुन सदरचा मर्ग नोंद करुन तपासात घेतला. |

## जुगार रेड :–

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | पो.स्टे. राजापेठ | अप क्र. ५७४/२३ कलम १२ अ मजुका | 2120 रु नगदी व 1 ते 10 आकडे लीहीलेल्या चिठया असा एकुण 2120 रु चा माल | हमालपुरा करण बारची गल्ली अमरावती | दि 17/6/23 चे 13.10 वा | दाखल दि 17/6/23 चे 16.48 वा | पोहेका मनिष करपे ब नं 1520 पोस्टे राजापेठ अम श | संतोश रमेश भोसले वय 41 रा हमालपुरा अम करण बार गल्ली | -हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी स्टाफ सह मिळालेल्या माहीती वर जुगार रेउ केली असता 2120 रु नगदी व 1 ते 10 आकडे लीहीलेल्या चिठया असा एकुण 2120 रु चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला वरुन आरोपी विरुध्द वर कलम 12 अ मजुका प्रमाणे गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन रेड :–

| अ.क्र | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | फ्रेजरपुरा | अप. न. ४४४/२०२३ क. ६५ (इ) मदाका | पो.स्टे. फ्रेजरपुरा हद्दीत | दि. १७/०६/२०२३ चे २०/४५ वा. | दि.१७/०६/२०२३ चे २२/१८ वा. | पोहेकाँ. सुनिल सोळंके ब. न. २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | एक महिला | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टॉफ सह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त दाराकडुन माहीती मिळाली की यातील आरोपी महीला ही तिच्या राहत्या घरा समोर लोकांनी दारुची विक्री करीत आहे. अश्या माहीतीवरुन आम्ही पंचासमक्ष यातील महीला आरोपी वर प्रोव्ही रेड केली अशता त्याचया ताब्यातुन टँगो पंच ची १८० मीली चा ४८ नग देशी दारुच्या च्या पावटया कि.अ.३३६०/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला अश्या फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | पो.स्टे. भातकूली | 120/23 कलम 65(ई) मदाका | जसापूर फाटा ता. भातकूली जि. अमरावती | दि. 17-06-2023 चे 18/30 वा. ते 19/00 वा. | दि. 17-06-2023 चे 20/15 वा. | सरतर्फे नापोकाँ लक्ष्मन खंडारे बं.नं. 995 पो.स्टे. भातकूली | 1)नामदेवराव रामरावजी मानकर वय 62 वर्षे<br>2)भगवान किसनराव तायडे वय 60 वर्षे दोन्ही रा. ग्राम सायत ता. भातकूली जि. अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमूद घटना ता वेळी व ठिकानी पो.स्टे. स्टाँप पो.काँ. 1850, 1193 सह यातील नमूद आरोपीवर गुप्त बातमी आधारे प्रोव्ही रेड केला असता आरोपीचे ताब्यात 80 नग देशी दारू बाँबी संत्रा 90ml च्या किमंत अंदाजे 2800 रू व TVS कंम्पनीची लाल रंगाची मोटर सायकल क्र. MH 27 BM 8504 किमंत अंदाजे 25,000 रू असा ऐकून 27,800 रू चा प्रोव्ही माल मिळून आल्याने पंचासमक्ष जप्त करून सदरचा गून्हा दाखल |
| 3 | पो.स्टे. भातकूली | 121/23 कलम 65(ई) मदाका | गणोजा देवी नदीच्या कोरड्या पात्रात ता. भातकूली जि. अमरावती | दि. 17-06-2023 चे 19/30 वा. ते 20/00 वा. | दि. 17-06-2023 चे 21/27 वा. | सरतर्फे ASI संजय तंतरपाडे बं.नं. 846 पो.स्टे. भातकूली | 1)रवि मानिकराव वानखडे वय 32 वर्षे रा. गणोजा देवी<br>ता. भातकूली जि. अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की, आम्ही ASI 846 दि.17-06-2023 रोजी सकाळी 09/00 वा. ते 21/00 वा. डा.ओ. ड्यूटी असता सोबत पो.काँ. 1512 पोलीस स्टेशन च्या 2nd मोबाईलने पेट्रोलिंग करीत असताना मा. पोलीस आयूक्त साहेब यांचे विशेष पथक PSI गजानन राजमलू ,HC 1132, HC 1166, NPC 1117, NPC 1365,PC 657,PC 1704, PC 1715 असे त्याचे वाहनाने गणोजादेवी स्टाँप वर भेटले त्यानी सांगीतले की, पेढी नदीच्या कोरड्या पात्रात अवैध्द देशी दारू ची विक्री सूरू आहे आम्ही पंचासमक्ष तेथे पोहचलो असता तेथे एक ईसम उभा होता त्याला पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव)रवि मानिकराव वानखडे वय 32 वर्षे रा. गणोजादेवी असे सांगीतले त्याचे जवळील नाँयलाँन पोत्याची पाहनी केली असता नाँयलाँन पोत्यात ऐकून 48 नग देशी दारू बाँबी संत्रा 180ml च्या किमंत अंदाजे 3360 रू चा माल मिळून आला त्याचे जवळ दारू विक्री बाबत परवाना नसल्याचे सांगीतले त्याचे विरूध्द् कलम 65(ई) मदाका प्रमाने सदरचा गून्हा दाखल |